शासन सेवेतील कर्मचाऱ्यांची/राज्यपत्रित
अधिकाऱ्यांची ज्येष्ठता यादी तयार करणे
व प्रसिध्द करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.८/९३/१२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-९ नोव्हेंबर, १९९३.

CR1993110901

वाचा:- शासन परिपत्रक सा.प्र.वि.क्रमांक :-एसआरव्ही-१०८७/६२४/पारा,२, दिनांक २१ एप्रिल, ८७.

## शासन परिपत्रक

शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०९३/प्र.क्र.८/९३, दिनांक१७जुलै, १९९३ नुसार सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात आली होती की, ज्येष्ठता यादया प्रतिवर्षी प्रसिध्द करण्याबाबत जे आदेश आहेत ते सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या पुन्हा निदर्शनास आणून त्यांच्या कक्षातील सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या दिनांक:-१जानेवारी, १९९३ पर्यन्तच्या ज्येष्ठता यादया तयार करुन त्या दिनांक ३१ सप्टेंबर, १९९३ पूर्वी प्रसिध्द कराव्यात आणि त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल सचिव (सेवा) यांच्याकडे दिनांक:-३१ ऑक्टोबर, १९९३ पूर्वी पाठवावा. तथापि असे निदर्शनास आले आहे की, एखादा विभाग वगळता याबाबतीत केलेल्या कार्यवाहीचा अहवालसुध्दा सचिव (सेवा) यांना अद्याप प्राप्त झालेले नाही तसेच ज्येष्ठता यादया प्रसिध्द करण्याबाबत गांभीर्यपूर्वक कारवाई केलेली दिसत नाही.

२. शासनाच्या विविध विभागातील संवर्गनिहाय ज्येष्ठता यादया प्रसिध्द करण्याबाबतची सद्यस्थिती काय आहे हे प्रथम जाणून घेण्यासाठी सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, आता पर्यन्त कोणत्या आधारभूत दिनांका-पर्यन्त ज्येष्ठता यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत आणि दिनांक:-१ जानेवारी, १९९३ या आधारभूत दिनांकाची ज्येष्ठता यादी तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली याबाबत संवर्ग निहाय आणि विभाग प्रमुखनिहाय माहिती सोबतच्या विवरणपत्रामध्ये भरुन ती सामान्य प्रशासन

कोणत्याही परिस्थिती दिनां बर, १९९३ पूर्वी पाठवावी.

महाराष्ट्राचे या आदेशानुसार नावाने,

सही

[ के.जे. डिसोजा ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सामान्य प्रशासन विभा आस्थापना बाबी हाताळणारी
सर्व कार्यासने.

कोणत्याही परिस्थिती दिनां                    बर, १९९३ पूर्वी पाठवावी.

महाराष्ट्राचे                    या आदेशानुसार नावाने,

सही

[ के.जे. डिझोजा ]

अवर सचिव, महाराष्ट्र शास

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सामान्य प्रशासन विभा                    आस्थापना बाबी हाताळण

सर्व कार्यासने.

## विवरण पत्र

प्रशासकीय विभाग.................

| अनु.क्रां. | संवर्गाचे नांव | प्रसिध्द केलेली शेवटची अंतिम ज्येष्ठता यादी कोणत्या आधारभूत दिनांकाची आहे. | शेवटच्या ज्येष्ठता यादीचा प्रसिध्द केला दिनांक | दिनांक.१.१.९३ची ज्येष्ठता यादी तयार करण्याबाबत केलेली कार्यवाही. | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

विभागप्रमुख कार्यालयाचे नांव[१]

१.
२.
३.
४.

विभाग प्रमुख कार्यालयाचे नांव [२]

१.
२.
३.
४.

विभाग प्रमुख कार्यालयाचे नांव [३]

१.
२.
३.
४.

(सोबत :- पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत या विषयावरील सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्र.बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब, दिनांक ३/१०/२००६ ची प्रत सोबत जोडली आहे)

---

क्र.साप्रवि/२००६/५०१/प्र.क्र.१४३/म-८

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २५/११/०६

कार्यासन अधिकारी ई, ई-१, ई-६, ई-७, ई-९, ई-१०, फ-४, फ-५, फ-७, फ-८, म-१, ल-७, र-१ कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित

(भा.श.वाणी)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

---

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :बीसीसी-२००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६ ब.
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दुरध्वनी क्र.२२०२५१७७
दिनांक :३/१०/२००६

प्रति,
अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

विषय :- पदोन्नतीतील आरक्षण हे पदोन्नतीच्या सर्व टप्प्यांवर लागू करणेबाबत

संदर्भ :- १) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २५/५/२००४

२) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक १४/२/२००५

३) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००४/ प्र.क्र.११८/०४/१६-ब, दिनांक १४/७/२००५

४) शासन निर्णय, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २४/८/२००६

५) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.बीसीसी-२००१/१८८७/ प्र.क्र.६४/०१/१६-ब, दिनांक २४/८/२००६

महोदय/ महोदया,

मा. उच्च न्यायालयातील सिव्हील ॲप्लीकेशन क्र.१७८३/२००६ (इन रीट पिटीशन क्र.८४५२/२००४) च्या संदर्भात दिनांक १७ ऑगस्ट, २००६ रोजी दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने उपरोक्त संदर्भ क्र.५ वरील दिनांक २४/८/२००६ च्या शासन पत्रान्वये या विभागाच्या दिनांक २५ मे, २००४ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीची कार्यवाही सुरु ठेवण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

२. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दिनांक १७/८/२००६ च्या आदेशांच्या व दिनांक १९/९/२००६ च्या आदेशांच्या (सिव्हील ॲप्लीकेशन क्र.२२८३/२००६ मधील) विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या Special Leave to Appeal (Civil) No (s) १६४८५/२००६ च्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

"Taken on board.

Operation of the impugned order is stayed till the matter comes up for preliminary hearing on 16 th October, 2006."

३. मा.सर्वोच्च न्यायालयाचे वरील आदेश पहाता संदर्भ क्र.५ वरील दिनांक २४/८/२००६ च्या पत्रानुसार पदोन्नतीसंदर्भात करावयाची कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्यात यावी.

४. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/ निमशासकीय इत्यादी कार्यालयांना या शासन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना द्याव्यात.

आपला

सही/-

(गो.आ.लोखंडे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.